


दैनिक

मनोरंजनासह प्रबोधनासाठी...

epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिंचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक ३२३ वा ●शुक्रवार, ता. ६ जून २०२५ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००


आज ६ जून २०२५ दै. रयत समाचारचा शिवराजाभिषेक विशेषांक प्रसिद्ध करताना आम्हाला आनंद होत आहे.

छत्रपती शिवाजी महाराज हे जगातील क्रांतिकारकांचे आदर्श. सर्वसामान्य रयतेच्या हिताचे राज्य करणे म्हणजेच लोकशाही पध्दतीने राज्य करणे ही रीत शिवरायांनी घालून दिली. म्हणूनच आज लोकशाहीमधे एका राजाचे नाव आदराने घेतले जाते. वस्तुतः राजेशाही व लोकशाही या विरोधी संकल्पना. जिथे राजेशाही होती तिथे लोकशाही नव्हतीच. परंतु शिवरायांनी स्थापन केलेले जगातील एकमेव स्वराज्य असे होते जिथे रयतेच्या हिताची लोकशाही होती.

शिवरायांनी अनेक संकटांना तोंड देत स्वराज्य निर्माण केले. त्याची बीजे अहमदनगरच्या निजामशाहीत असल्याचे जगभरातील इतिहासकारांनी मान्य केले आहे. शिवरायांचा राजाभिषेक ही जगातील दुर्मिळात दुर्मिळ घटना. राजाभिषेकावेळी अनेक घटना घडल्या यावर जगभरातील लेखकांनी विविध पैलूंवर लिखाण केलेले. अनेक परदेशींनी आपल्या देशात याविषयी वृत्तांत पाठविले. राजाभिषेक प्रसंगी रायगडावर अनेक परदेशी पाहुणे उपस्थित होते. त्यांनी या घटनेचे वर्णन लिहून ठेवले. या घटनेने जगभरातील देश व राजे अचंबित होऊन गेलेले होते. ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी शालिवाहन शके १५९६ म्हणजेच ६ जून १६७४ रोजी शिवरायांनी स्वतःस अभिषेक करून घेतला आणि एका सार्वभौम राज्याच्या जयघोष केला. कित्येक वर्षे गुलामीत राहिलेल्या मराठी मुलुखात नवचैतन्याचा सोहळा पार पडला. हा अत्यंत व्यापक आणि भारताच्या इतिहासातील महत्वाचा प्रसंग होता. राजाभिषेकावेळी छत्रपती शिवाजी महाराजांनी छत्रपती हे पद धारण केले. छत्रपती म्हणजे सार्वभौम आणि सर्वेसर्वा, रयतेचा राजा. आज शुक्रवार ६ जुन २०२५ रोजी ३५१ वा शिवराजाभिषेक दिन आहे. यानिमित्त दै. रयत समाचारच्या वतीने शिवरायांच्या विविध पैलूंवर विषेशांक प्रसिध्द करण्यात आला आहे. हा अंक कायमस्वरूपी संग्रही असावा असा आपला प्रयत्न. शिवरायांची रयत आताच्या काळातही सुखीसमाधानी असावी म्हणून रयत समाचार कार्यरत राहील. हीच शिवरायांच्या चरणी प्रार्थना...

**- टीम रयत समाचार**

# बफर झोनमधील गावांमध्ये एआय कॅमेरे लावणार

**मुंबई । प्रतिनिधी**

वन्यजीव व मनुष्य यांच्यातील संघर्ष टाळण्यासाठी तसेच वन्य प्राण्यांच्या हल्ल्यापासून ग्रामस्थांना वाचविण्यासाठही राज्यातील ज्या ज्या भागात वन्य प्राण्यांचा वावर आहे, अशा वनालगतच्या बफर झोनमधील गावांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर असणारे कॅमेरे लावण्यात यावेत.



यासाठी राज्य शासनाच्या मार्वल या संस्थेची मदत घेण्यात यावी. येत्या पंधरा दिवसात ही कार्यवाही युद्धपातळीवर पूर्ण करण्याचे निर्देश वन मंत्री गणेश नाईक यांनी आज येथे दिले. विदर्भात विविध ठिकाणी होणाऱ्या मानव व वन्य जीव संघर्ष व वन्य प्राण्यांच्या हल्ल्यासंदर्भात आज मंत्रालयात बैठक झाली. यावेळी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, राज्यमंत्री आशिष जायस्वाल, आमदार परिणय फुके, अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल) शोमिता बिश्वास, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) श्रीनिवास राव यांच्यासह इतर अधिकारी उपस्थित होते



## नागरिकांनी पर्यावरण संवर्धनाची सुरुवात स्वत:पासून करावी- मुंडे

**मुंबई । प्रतिनिधी**

एकल वापरातील प्लास्टिक हा असूर असून त्याला पूर्णतः नष्ट करण्यासाठी पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या माध्यमातून कार्य करत आहोत.यात जनतेचा सहभाग आवश्यक आहे.

यासाठी नागरिकांनी पर्यावरण संवर्धनाची सुरुवात स्वत:पासून करावी,असे आवाहन मंत्री पंकजा मुंडे यांनी पर्यावरण परिषदेत केले. जागतिक पर्यावरण दिनानिमित्त पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या विद्यमाने पर्यावरण परिषदेचे आयोजन करण्यात आले. यावेळी सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार, प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम, विभागाच्या सचिव जयश्री भोज उपस्थित होते.पर्यावरण विभागाने महापर्यावरण हे अप्लिकेशन सुरू करून महत्त्वाचे पाऊल उचलले आहे.

विकसित, संपन्न, समृद्ध व दिशादर्शक कामे करणारे महाराष्ट्र हे देशातील महत्त्वाचे राज्य आहे. त्यामुळे राज्य वातावरणीय बदल कृती आराखडा हा देशासाठी दिशादर्शक ठरणार आहे, असे मंत्री ॲड.आशिष शेलार यांनी सांगितले

## पुनर्वसित गावठाणांमध्ये सुविधा देण्यास शासनाचे सर्वोच्च प्राधान्य

**मुंबई । प्रतिनिधी**

पुनर्वसित गावठाणांमध्ये आवश्यक नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यास शासनाने सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. जिगाव सिंचन प्रकल्पामुळे पुनर्वसित झालेल्या गावठाणांमध्ये तातडीने आवश्यक नागरी सुविधा पुरविण्यात याव्यात, असे निर्देश मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी या संदर्भातील बैठकीत दिले. खडकपूर्णा व जिगाव प्रकल्पग्रस्तांच्या विविध प्रश्नांसदर्भात मंत्री श्री. जाधव-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील त्यांच्या समिती कक्षात बैठक झाली. या बैठकीस आमदार मनोज कायंदे यांच्यासह पुनर्वसन व जलसंपदा विभागातील संबंधित अधिकारी उपस्थित होते.






## आपल्या छत्रपती घराण्यातील प्रथा आणि परंपरा

### श्री शिवछत्रपती महाराज यांचा राज्यरोहण दिन समारंभ

सकाळी ६ ते ८-३० श्री अंबादेवघरी श्री कुलस्वामीनी तुळजा-भवानी देवीस अभिषेक होतो. सकाळी ९ वा. श्री शिवाजी महाराज व राजगादीसमोर बिछायत करून जरीचे अभ्रे घालण्यांत येतात. सकाळी १० वा श्री तुळजाभवानी देवीस महानैवेद्य, आरती मंत्रपुष्प प्रार्थना करण्यांत येते. सकाळी १०-१५ :- श्री शिवाजी महाराज यांचे तक्ताचे व राजगादीची पूजा श्री. राजोपाध्ये यांनी करून तक्त व गादीपुढे नारळ, पान विडे, पेढे व दक्षिणा ठेवणेत येऊन पेढे वाटतात, श्री हुजूर स्वारींचा मुक्काम करविरी असलेत निराळा कार्यक्रम ठेवलेला असतो. त्याची फाईल स्वतंत्र आहे. सायंकाळी ४ वा. श्री हुजूर स्वारीना श्रीफळ, फळे व प्रसाद देणेत येतो.

**- अमित आडसुळे**
मोडी संशोधक



कोट फोंडा येथील पीर अबदुल्लाखानाच्या दर्ग्यास संभाजी छत्रपतीचें वतनपत्र
( डॉ. पिसुर्लेंकर संग्रह )

# शिवाजीनें मशिदी पाडल्या काय ?

शिवभारतांत अध्याय १८ मध्यें पुढील श्लोक आहेः- त्वया गृहीता कल्याणं तथा भीमपुरीमपि । यवनानां महासिद्धि निलयाः किल पातिताः ।। ५२ ।। याचा अर्थ '' कल्याण व भिवंडी घेऊन त्यां यवनांच्या मशिदी पाडल्या '' असा केला आहे. शिवाजी महाराजांनी मशिदी कधींहि पाडल्या नाहींत, मुसलमानांनीं देवळे पाडलीं तरी उट्टे म्हणून मशिदी पाडल्या नाहीत. मशिदी, फकीर व स्त्रिया यांस त्यांनीं कधींहि हात लावला नाहीं असें काफीखानहि लिहितो. तेव्हां हे भाषांतर चुकलें आहे असें मला वाटतें. मागील लेखांत पुण्यदेश याचा पुणे प्रांत असा जो अर्थ केला आहे तो चुकला असून श्लोकाच्या पुढील भागांतील ''भीमरथीमनु'' या शब्दावरून त्याचा भीमा नदीकाठचा पुण्य प्रदेश (पेडगांव) असा अर्थ घ्यावा लागतो, हे दाखवलें आहे. तसाच प्रकार येथे दिसतो. पुढील श्लोक असा आहे-''तुभ्यं कुप्यन्ति तेऽद्यापि यवनाः पवनाशनाः। अपहृत्यापि सर्वस्वं कृता येषां विडम्बना ।। '' यांत ते यवन सर्वस्व हरण झाल्यानें सापासारखे संतापले आहेत असें म्हटलें आहे. तेव्हां ते यवन धर्महानि झाल्यानें संतापले नव्हते. तर त्यांचे संपत्तिपूर्ण वाडे पाडल्यानें संतापले होते हे अनुमान सहज निघतें. आणि महासिद्धि याचा अर्थ महान संपत्तियुक्त सिद्धि ज्यांत आहे ते निलय वाडे असा दिसतो, कल्याणास त्या वेळीं पश्चिमेकडील व्यापार करणारे, मुसलमान असल्यानें ते फार श्रीमंत होते. त्यांस शिवाजीनें लुटलें, वाड्यांस खणती लावून पाडले व भूमिगत द्रव्यहि नेलें हे ठीक आहे.येथे कल्याणसंबंधी जी माहिती ग्याझिटियरने दिली आहे ती देण्यासारखी आहे. कल्याणचे शेनाळें तळे जुनेंच होतें तें दगडी चौफेर घाट बांधलें, (इ. १५०६) अर्थात् निजामशाहीच्या वेळी. याच्या कांठीं मोहतरखान याचा मुकरबा आहे. हा शहाजहानाचा अधिकारी होता. यानें इ. १६९४ मध्ये कोट बांधला. ही शिवाजीच्या नंतरची हकिकत आहे. खाडीच्या किनाऱ्यावर एक लहान टेकडी आहे. तीवरील किल्ला प्राचीन असावा, तेथें बहुधा पेशवाईत मराठ्यांनी दुर्गादेवीचें देऊळ बांधलें. जुम्मा मशीद होती तेथे रामाचें देऊळ बांधलें गेलें. त्याची मिति १७६०-१७७२ इ. अशी दिली आहे. माझ्या लहानपणीं शंकरशेट सोनार म्हणून एक वृद्ध गृहस्थ मला सांगत असे की, रामाजी महादेवांनीं मुसलमानांस राजी करून त्यांच्या हातून मशिदीचीं कौलें उतरविलीं. यावेळीं ब्राह्मणवस्ती गांवांत आली असल्यानें ही जुम्मा मशीद हिंदूवस्तींत आली आणि मुसलमानवस्ती बंदराकडे गेल्यानें त्यांना ती दूर झाली. ह्या गोष्टीमुळे मुसलमान राजी झाले असावेत. दुर्गाडी किल्ल्यावरील देवीच्या देवळांतील मूर्ति इ. स. १८७६ मध्यें कोणी चोरून नेली असें वर्णन आहे. असो. इ. स. १६४८ मध्यें आबाजी सोनदेव यानें कल्याण घेतलें असें यांत म्हटलें आहे त्यास आधार काय ! जेधे शकावलीत शिवाजीनें कल्याण घेतलें एवढेंच आहे. स्वतः किंवा दुसऱ्यामार्फत, हें नक्की ठरत नाहीं. तरी शिवाजीमहाराज कल्याणास जरूर गेले असावेत. त्यांनी मुसलमान श्रीमंत व्यापाऱ्यांस लुटलें असावें. पण मशिदी पाडल्या असें संभवत नाहीं. *(भा.इ.सं.मं, त्रैमासिक, पौष श.१८५२, संपा.प्र.दत्तो वामन पोतदार, गं.ना. मुजुमदार)*




**- श्री. चिं. वि. वैद्य**

## रायगडावरील तोफांचे संवर्धन करणारे डॉ.आंबेडकर आणि त्यांचे सहकारी

३ फेब्रुवारी १९२८ चाय बहिष्कृत भारत मध्ये महाड सत्याग्रह परिषद झाल्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांचे सहकारी यांच्या रायगड सफरची नोंद केली आहे. या नोंदीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी रायगडवरील अनेक ऐतिहासिक स्थळांचे दर्शन घेतल्याचे वर्णन करण्यात आले आहे.

यावेळी गडावर जाताना वाटेतील झाडीत झाकून गेलेल्या तोफा बाहेर काढून त्या लोकांना दिसतील अशा ठेवण्यात आल्याची नोंद पुढील प्रमाणे दिली आहे.

(महाड परिषद आटपून सगळी मंडळी रात्री ९ वाजता पाचाड गावात मुक्कामास गेली ) दुसऱ्या दिवशी सकाळी ७ वाजता मंडळीने खुबलढाच्या बाजुने गड चढण्यास सुरवात केली. व सुमारें ९ वाजता गडावर पोहोचली.

वाटेत शिवाजी महाराज की जय घोषणा चाललीच होती. तसेच जागजागी गडावरील तोफा ज्या झाडीमध्ये अगदी झाकून गेल्या होत्या त्यांना झाडीतून बाहेर काढून रस्त्याच्या बाजूला लोकनिदर्शनास येतील अशा जागी आणून ठेवण्याचा मंडळीने जागजागी प्रयत्न केला.

**राम यादव,** कोल्हापूर



## छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्यकारभाराची महती

**अनेक उदाहरणे दिली जातात. त्यातील दोन महत्वाची उदाहरणे** - १) रांझ्याचा वतनदार पाटलाने गावातील एका गरीब शेतकऱ्याच्या मुलीवर अत्याचार केला. मुलीने जीव दिला. महाराजांच्या कानावर ही गोष्ट गेल्यानंतर पाटलाच्या मुसक्या बांधून पुण्याला आणले गेले. तत्कालीन कायद्याप्रमाणे हातपाय तोडायची शिक्षा झाली व ती लगेच अंमलातही आली. २) सकुजी गायकवाड या महाराजांच्या सेनापतीने बेळवाडी किल्ला जिंकला. विजयाच्या उन्मादात त्याने किल्ल्याची किल्लेदार सावित्रीबाई देसाई या स्त्रीवर अत्याचार केला. महाराजांना हे समजल्यानंतर त्यांनी सकुजी गायकवाडचे डोळे काढायला लावले व त्यास जन्मभर तुरुंगात डांबले. वरील उदाहरणांमधील एकजण गावचा वतनदार पाटील तर दुसरा सैन्याचा सेनापती होता. एक प्रकारे दोघेही राज्यकारभारातील सहकारी होते. ज्यांच्या सहकार्याने राज्य करायचे त्यांचीसुद्धा चूक झाली तर हयगय करायची नाही, यासाठी न्यायावरची एक जबर निष्ठा लागते. छत्रपती शिवाजी महाराजांजवळ ती होती. त्यामुळे आज लोकशाहीतही वारंवार महाराजांची आठवण येते!

**- संदेश कासार,** अकोले

# छत्रपती शिवाजी महाराज व अहल्याबाई होळकर यांच्या ध्येयधोरणांतील समानता





निराशेच्या अंधकारात अचेतन बनलेल्या समाजाला चेतना देऊन संस्कृती; राष्ट्रीय अस्मिता जागविणाऱ्या, समाजातील सर्व समुदायांचे संघटन करून त्यांना स्वातंत्र्याच्या कल्पनेने भारावून टाकणाऱ्या, स्वराज्याचे रोपटे लावून त्याचे प्रचंड वृक्षात रूपांतर करणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य केवळ अद्भुत असेच आहे. म्हणूनच छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांचे शिवचरित्र हे मराठी माणसांचे महाकाव्य बनलेले आहे. शिवचरित्र हा एक जिवंत, तेजस्वी इतिहास असून तो या महाराष्ट्राच्या भूमीत निर्माण झालेला आहे. आजवर झालेल्या इतिहास संशोधनातून छत्रपती शिवाजी महाराजांच्या व्यक्तिमत्त्वाचे, कार्यकर्तृत्वाचे, त्यांच्या ध्येयधोरणाचे अनेक पैलू प्रकाशात आले आहेत. त्यांनी स्थापन केलेल्या स्वराज्याचे पुढे साम्राज्य झाले. पहिल्या बाजीराव पेशव्यांच्या विस्तारवादी धोरणामुळे आणि त्यांच्या तालमीत तयार झालेल्या होळकर, शिंदे, पवार, गायकवाड आदी मराठा सरदारांच्या अविरत मेहनतीमुळे अठराव्या शतकाच्या मध्यावर मराठा सत्ता ही संपूर्ण हिंदुस्थानातील सर्वांत प्रभावी सत्ता बनली. याकाळात स्वकर्तृत्वाने पुढे आलेल्या होळकर घराण्याचे मराठ्यांच्या इतिहासात महत्त्वपूर्ण स्थान आहे. मल्हारराव होळकर यांची सून अहल्याबाई होळकर यांची कारकीर्द होळकरशाहीच्या व मराठ्यांच्याच नव्हे तर संपूर्ण भारताच्या इतिहासावर अमीट ठसा उमटवणारी ठरली.

छत्रपती शिवाजी महाराज आणि अहल्याबाई होळकर यांच्या कार्यांमध्ये सुमारे एक शतकभराचे अंतर असले तरी शिवरायांच्या ध्येयधोरणांमध्ये आणि अहल्यादेवींच्या ध्येयधोरणांमध्ये बहुतांशी साम्य दिसून येते. तसेच या दोन्ही व्यक्तींची वैचारिक बैठक व कार्यप्रणाली जेवढी एकमेकांशी मिळतीजुळती वाटते तेवढी दरम्यानच्या शंभर वर्षांत आणि पुढील काळात होऊन गेलेल्या कोणत्याही राज्यकर्त्यांशी साम्य दर्शवीत नाही. छत्रपती शिवाजी महाराज हे स्वतंत्र व सार्वभौम राष्ट्रनिर्माते आहेत. अनभिषिक्त राजे आहेत, तर होळकर घराणे हे मराठा राज्यातील एक बलाढ्य सरदार घराणे आहे. छत्रपती शिवरायांचे स्थान व अधिकार आणि अहल्याबाईंचे स्थान आणि अधिकार यांत मूलभूत फरक असल्याने प्रस्तुत लेखातून छत्रपती शिवाजी महाराज आणि अहल्याबाई होळकर यांचा तुलनात्मक अभ्यास करण्याचा किंवा अहल्याबाईंना महाराजांच्या बरोबरीच्या ठरविण्याचा कोणताही उद्देश नाही, हे सुरुवातीसच प्रांजळपणे स्पष्ट करतो. येथे फक्त छत्रपती शिवाजी महाराज व अहल्याबाई यांच्या ध्येयधोरणांतील समानता दाखवून देण्याचा प्रयत्न केला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी जे हेतू किंवा उद्देश डोळ्यांपुढे ठेवून स्वराज्याची स्थापना केली, त्या उद्देशांची परिपूर्तता अहल्याबाईंच्या कार्याने झाली. वारकरी संप्रदायात ज्ञानदेवे रचिला पाया। तुका झालासे कळस । असे म्हटले जाते. ज्याप्रमाणे ज्ञानेश्वर आणि तुकाराम दोघेही आपापल्या स्थानी श्रेष्ठच आहेत. महाराजांनी शून्यातून स्वराज्य निर्माणाचे असमान्य कार्य हाती घेतल्यापासूनच काही निश्चित ध्येयधोरणे आखली होती. तीच पुढे त्यांच्या राजनीतीची उद्दिष्टे व तत्त्वे बनली. त्यामध्ये प्रामुख्याने धर्माचे रक्षण व संवर्धन, स्वतंत्र व सार्वभौम राज्याची निर्मिती, जुलुम अन्याय, भ्रष्टाचाराचे निर्मूलन, शेतकरी व कष्टकऱ्यांना स्वाभिमानाने आणि स्त्रियांना मानाने व अब्रूने जगता आले पाहिजे इत्यादींचा उल्लेख करता येईल. थोडक्यात स्वराज हे सुराज्य असले पाहिजे हे महाराजांच्या राजनीतीचे आद्यसूत्र होते. स्वराज्य स्थापनेच्या काळातील परिस्थिती आणि मराठी राज्याचे साम्राज्यात रूपांतर झालेल्या काळातील परिस्थिती यात खूप फरक होता. अहल्याबाईंपुढे राज्य स्थापण्याचे कार्य नव्हते तर ते टिकविण्याचे व वाढविण्याचे कार्य होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या उद्देशांपैकी स्वतंत्र व सार्वभौम राज्य निर्माण करणे हा उद्देश व कार्य सोडल्यास इतर सर्व उद्देश अहल्याबाईंच्या विचारधारेतून व कार्यप्रणालीतून स्पष्ट होतात.

प्रजाहित : छत्रपती शिवाजी महाराज आणि अहल्याबाई या दोघांनीही प्रजाहितासाठीच राज्य चालविले होते. स्वतःला ऐशारामात, वैभवात जीवन जगता यावे, सुखसंपत्तीचा उपभोग घेता यावा, आपणाला मोठा मानसन्मान मिळावा, इतरांवर अधिकार गाजवता यावा, असे विचार त्यांच्या मनात स्पर्शनही गेले नव्हते. ‘‘राजा हा प्रजेचा विश्वस्त आहे.‘‘ हीच भावना त्यांच्या ठायी होती. आपल्या प्रजेची शक्य तेवढी सेवा आपल्या हातून घडावी यासाठीच त्यांची कारकीर्द खर्ची झाली. लोककल्याणाची तळमळ महाराजांच्या आज्ञापत्रामधून दिसून येते. प्रभावळीच्या सुभेदारास महाराज लिहितात, ‘‘एका भाजीच्या देठासही तू मन दाखविता कामा नयें; रयतेचा वाटा रयतेस जावा व सरकारचा वाटा सरकारास मिळावा, असे तू वागावयास हवे. रयतेस काडीचाही त्रास तू देता कामा नये; तू जर गैर वागलास तर साहेब तुजवर राजी नाहीत. हे समजून अस.‘‘ अहल्याबाईंनी आपल्या प्रजेच्या हितासाठी सतत काळजी घेतली. आपल्या लष्करी व प्रशासकीय अधिकाऱ्यांना जनतेची काळजी घेण्याविषयी शेकडो पत्रे अहल्याबाईनी लिहिलेली आहेत. त्यापैकी एक पत्र नमुन्यादाखल येथे देत आहे या पत्रातून शिवाजी महाराजांइतकाच परखड आदेश दिसू येतो. अहल्याबाई ६ जून १७७६ रोजी चांदवडच्या मामलेदारास लिहितात की, ‘‘तीर्थरूप सुभेदारांनी (मल्हारराव होळकर) कोणकोणत्या प्रकारे आणून रयतेचे संगोपन केले अतःपर गैरवाजवी उपसर्ग लागू नये. रयतेची दिलभरी करून हरएक प्रकारे गौर करीत जाणे. फिरून बोभाट आलिया उपयोगी पडणार नाही व परिणाम लागणार नाही.‘‘ छत्रपती शिवाजी महाराज व अहल्याबाई या दोघांनीही आपल्या कारकिर्दीत प्रजेला सुखी करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. महाराजांनी प्रजेचे पालन, रक्षण, संवर्धन यासाठी उपाय योजून आदर्श, प्रजाहितदक्ष शासनसंस्थेचा पाया घातला. तीच कार्यप्रणाली स्विकारून अहल्याबाईंनी प्रशासन चालविले. प्रजाहितदक्षता हा अहल्याबाईंच्या प्रशासनाचा मुख्य गुण होता. शेतकरी हा राज्याचा कणा मानून त्यांनी शेतीविषयक कायदे केले. दीर्घ मुदतीच्या कराराने जमिनी पट्ट्याने देण्याची पद्धत सुरू केली. शेतकऱ्यांना विविध प्रकारे सहकार्य केले. शेतसाऱ्याचा दर कमीत कमी ठेवला. अतिवृष्टी, दुष्काळ, रोगराई किंवा लष्करी हालचालीमुळे पिकांची हानी झाल्यास सारामाफी व काही प्रसंगी नुकसान भरपाई देखील झाली. ठरल्यापेक्षा अधिक सारा बसूल करणाऱ्या अधिकाऱ्यांना कडक शिक्षा सुनावल्या. थोडक्यात छत्रपती शिवाजी महाराजांप्रमाणेच अहल्याबाईनीदेखील प्रजाहिताला अग्रकम दिला होता.

लष्करी संघटन : राज्य स्थापना, वाढ आणि संरक्षण यासाठी मोठ्या व सुसंघटित लष्कराची आवश्यकता आहे, हे महाराजांनी जाणले होते स्वतः छत्रपती शिवाजी महाराज अद्वितीय सेनानी होते. अनेक लेखकांनी त्यांना परशुराम, कृष्ण, बलराम या पौराणिक सेनानींच्या पंगतीत बसविले आहे. पाश्चात्त्यांनी अलेक्झांडर, सीझर, नेपोलियन या श्रेष्ठ सेनानींशी त्याची तुलना केलेली आहे. राष्ट्रप्रेम, स्वामीनिष्ठा, शिस्त, साधेपणा, रोख पगार, गनिमी कावा इ. वैशिष्ट्ये महाराजाच्या सैन्याची सांगता येतात. लष्कराच्या उभारणीत, विविध लष्करी मोहिमांमध्ये, लढायांमध्ये महाराजाचे कौशल्य मोठ्या योग्यतेचे आहे. अहल्याबाई या स्त्री असल्याने प्रत्यक्ष रणभूमीवर लढाई करणे तसेच मोहिमांचे नेतृत्व स्वतः करणे तत्कालीन सामाजिक रीतिरिवाजांमुळे शक्य नव्हते तथापि जेव्हा असे काही बिकट प्रसंग आले तेव्हा त्यांनी रणांगणावर ठामपणे उभे राहण्याचे धाडस दाखविले. लष्करी व्यवस्थापनाकडे अहल्याबाईंनी कधीही दुलक्ष केले नाही. पेशवाईच्या कालखंडात होळकरांची लष्करी शक्ती सर्व मराठा सरदारांमध्ये श्रेष्ठ प्रतीची कशी राहील यावर त्यांचा कटाक्ष असे. तुकोजी होळकरंकडे फौजेची सर्व सूत्रे देऊन त्यांच्या हातून विविध लष्करी मोहिमा अहल्याबाईंनी यशस्वी केल्या महादजी शिंदे व इतर मराठा सरदारांना वेळोवेळी सैन्याचा व लष्करी साहित्याचा पुरठा केला. लष्करी व्यवस्थापनाची उत्तम जाण आणि शासनकर्त्याचे उत्तम ज्ञान अहल्याबाईंना होते. आपले सैन्य कमी करणे म्हणजे पाठीचा कणा मोडून घेण्यासारखे आहे, असे त्यांचे विचार होते. पेशव्यांनी स्वतः जवळ मोठे सैन्य बाळगावे असा सल्ला त्यांनी कित्येकदा दिला होता. अहल्याबाई दोन चार वेळा बोलली ‘‘जे श्रीमंत फौजेची उपेक्षा करतात; परंतु गोष्ट कार्याची नाही. आपण आपले फौजेनिशी बळकट असावे.‘‘ असे महेश्वर दरबारच्या बातमीपत्रात नमूद आहे. किल्ल्यांचे महत्व ओळखून छत्रपती शिवाजी महाराजानी किल्ले मिळविण्यावर व नवे बांधण्यावर भर दिला होता. तसाच अहल्याबाईंनीही होळकराच्या अधिकारक्षेत्रातील किल्ल्यांच्या रक्षणासाठी प्रयत्न केला. होळकरांच्या प्रदेशात सागरी प्रदेश नव्हता. आरमारही नव्हते. तरीही सागरी किल्ल्यांचे व आरमाराचे महत्व अहल्यादेवींना देखील छत्रपती शिवाजी महाराजाइतकेच समजले होते, असे म्हणता येईल. मराठ्यांनी वसईचा किल्ला गमावल्यानंतर अहल्याबाईंनी महादजी शिदेजवळ ‘‘तुम्ही शंभर ओढी सागा, एक वसई असती तर काही चिंता नव्हती; परंतु (आता) ही तुमची बोलणी व्यर्थ’ अशी प्रतिक्रिया व्यक्त केली होती

सामाजिक समता : हिंदू-मुस्लिम असा धर्मभेद बाजूला ठेवून आणि जातिभेदाला मूठमाती देऊन छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्यकार्यात अठरापगड जातीजमातींना सहभागी करून घेतले. योग्यतेप्रमाणे जबाबदाऱ्या सोपविल्या. तेच धोरण अहल्यादेवींनीही अनुसरले होते. विविध जातीधर्माचे लोक त्यांनी राज्यकारभारात सहभागी करून घेतले होते. अहल्याबाईंनी जसा विद्वानांना, ब्राह्मणांना उदार आश्रय देऊन त्यांचा प्रतिपाळ केला, तसाच सातपुड्याच्या पर्वतराजीत राहणाऱ्या व समाजाने चोर-लुटारू उरविलेल्या भिल्लांना उपजीविकेचे साधन देऊन त्यांच्यामार्फतच चोऱ्यामाऱ्यांचा बंदोबस्त करून समाजातील सर्व स्तरांच्या लोकांचे हितरक्षण केले.

न्यायनिष्ठा : मराठेकाळात न्याय शक्यतो गोतसभा, धर्मसभा, जातपंचायत, सरकारचे स्थानिक अधिकारी यांच्या माध्यमातून दिला जात असे; पण काही प्रकरणे राज्यकर्त्यांपुढेही येत होती. शिवकालीन संदर्भ साधने मर्यादित असल्याने छत्रपती शिवाजी महाराजांनी केलेल्या न्यायदानाची उदाहरणे विपुल प्रमाणात उपलब्ध होत नाहीत, तरीही जी आहेत त्याआधारे महाराजांची न्यायावर आढळ निष्ठा होती असे स्पष्ट होते. कोणताही भेदभाव न करता न्याय दिला जात होता. महाराज हे न्यायप्रिय राजे होते, याबद्दल दुमत राहत नाही. अहल्याबाईंची कारकीर्द तर न्यायनिष्ठेमुळेच जनमनात अविस्मरणीय ठरली आहे. त्यांनी दिलेल्या न्यायनिवाड्याची कित्येक उदाहरणे ऐतिहासिक दस्तऐवजांमधून उपलब्ध होतात. त्यांच्या न्यायीपणावर लोकांची एकच श्रद्धा होती की, अहल्याबाईनी दिलेला न्याय अमान्य करणे म्हणजे पाप करणे असे लोक समजत होते. शिंदे-होळकरांमध्ये एका भूभागावरून वाद निर्माण झाला तेव्हा शिंद्यांनी याचा निकाल लावण्यासाठी अहल्याबाईची पंच म्हणून नेमणूक केली. या प्रकरणाचे वैशिष्ट्य असे की, स्वत: अहल्याबाई एका पक्षाच्या फिर्यादी होत्या. तरीही त्यांचा नि:पक्षपाती स्वभाव व न्यायप्रियता यावर शिंद्यांचा पूर्ण विश्वास असल्याने अहल्याबाईंनीच निर्णय द्यावा असे त्यांचे मत होते. अहल्याबाईनी या भूभागाचा निर्णय असा दिला की, ही विवादित भूमी जनावरांना चराईसाठी दोन्ही पक्षांनी सोडून द्यावी. हा निर्णय दोन्ही पक्षांनी मान्य केला होता आणि तो प्रदेश आधुनिक मध्यप्रदेश राज्याची निर्मिती होईपर्यंत तसाच गोचर भूमी म्हणून कायम होता. रयतेचेच नव्हे तर मराठा राज्यातील सरदारांचे आपापसांतील तंटे, शेजारी राज्यांतील राज्यकर्त्यांमधील वाद सोडविण्यासाठी अहल्याबाईकडे येत असत. त्यावर योग्य तो न्यायनिवाडा केला जात असे. छत्रपती शिवाजी महाराज आणि अहल्यादेवी होळकर ही मराठेशाहीतील दोन व्यक्तिमत्वे न्यायाच्या बाबतीत अत्युच्च शिखरावर पोहोचलेली होती, असे म्हणता येईल.

इंग्रजासबंधी सावधानता : इंग्रज हे धूर्त असून त्यांच्यापासून स्वराज्याला त्रास होतो याची कल्पना शिवाजी महाराजांना होती. म्हणून त्यांनी इंग्रजाशी कधी सलोख्याचे तर कधी त्यांना वठणीवर आणण्यासाठी संघर्षाचे धोरण स्वीकारले होते. शिवाजी महाराजांच्या काळात इग्रजांच्या हालचाली राजसत्ता मिळविण्यासाठी झाल्या नसून फक्त व्यापारवृध्दीसाठी झाल्या होत्या. पुढे सर्व भारत देश जिकून इंग्रज आपले राज्य स्थापन करतील असे काही चित्र दिसत नव्हते. त्यामुळे इग्रजांचा पुरता बंदोबस्त न करता त्याना जरबेत ठेवण्याचा प्रयत्न महाराजांनी केला; परंतु अहल्याबाईंच्या कारकिर्दीत इंग्रजांचे रूप पालटले होते. हिंदुस्थानच्या राजकारणात हस्तक्षेप करून बराच प्रदेश त्यांनी बळकावला होता आणि मराठ्यांच्या राज्यातही पाय पसरण्यास सुरुवात केली होती. इंग्रजांचा मराठा राज्यावरील दबाव वाढत असतानाही त्याची जाणीव अहल्याबाईस झाली नाही, असा आक्षेप गो. स. सरदेसाईंनी आपल्या ग्रंथात नोंदविला आहे; पण त्यामध्ये अजिबात तथ्य नसल्याचे अनेक पुराव्यावरून सिद्ध होते. अहल्याबाईंना इंग्रजाचे अतःस्थ उद्देश पूर्णपणे उमजले होते व त्याचा बदोबस्त कसा करावा याबद्दल पेशव्यांना व इतरांना अहल्यादेवींनी अनेकदा मार्गदर्शन केले होते. ‘‘वरकड व्याघ्रादीक श्वापदे बळ व युक्तिप्रयुक्तीने मारतील; परंतु अस्बलाचे मारणे फार कठीण आहे. सुरत धरून मारले तरच मरेल. नाहीतर अस्वलाचे चपेटीत कोणी सापडला तर गुदगुल्या करूनच अस्वल त्यास मारील. तद्वत ही इंग्रजाची लढाई आहे…‘‘ अशा शब्दांत इंग्रजाविषयी आपले मत अहल्याबाईनी व्यक्त केले होते. म्हणजेच इंग्रजाच्या धूर्त नीतीचा पूर्ण उलगडा त्यांना झाला होता. राघोबादादाने इंग्रजाशी सलोखा करू नये, म्हणून अहल्याबाईनी शक्य तेवढे प्रयत्न केले. इंग्रजांनी वसई घेण्यासाठी हालचाली सुरू केल्याचे समजताच फ्रेचांची मदत घेऊन पेशवे व आंग्रे यांनी कशी व्यूहरचना करावी याबद्दल खूप मुत्सदेगिरीचे राजकारण त्यांनी चालविले होते. पण नाना फडणविसाने अहल्याबाईंच्या सूचनांकडे दुर्लक्ष केल्यामुळे मराठ्यांना वसई गमवावी लागली. इंग्रजांशी टक्कर देता यावी म्हणून पाश्चात्य पद्धतीचे सैन्य उभे करण्यासाठी अहल्याबाईंनी आपल्या लष्करात फ्रेंच, अमेरिकन अधिकारी नेऊन त्यांच्याकडून कवायती पलटणी तयार करून घेतल्या होत्या.

धर्म, संस्कृतीचे रक्षण व संवर्धन : छत्रपती शिवाजी महाराज व अहल्याबाई होळकर हे दोघेही धर्मसहिष्णुवृत्तीचे असले तरी स्वधर्माचे अभिमानी होते. या भूमंडळाचे ठायी । धर्मरक्षी ऐसा नाही । अशा शब्दांत समर्थ रामदासांनी महाराजांचे वर्णन केले आहे. धर्म व संस्कृतीची जोपासना हे स्वराज्य स्थापनेचे मुख्य उद्दीष्ट होते. त्या उद्दिष्टांपासून महाराज कधीही ढळले नाहीत. सामान्यपणे वागताना देवतापूजन, सणसमारंभ, साधूसंतांचा अनुग्रह, गाठीभेटीसाठी मुहर्त पाहणे, कपाळाला गंध लावणे, सात्तिक आहार, दान-दक्षिणा अशा कितीतरी गोष्टी ते एखाद्या निष्ठावंताप्रमाणे करीत असत. आपल्या राज्यातील मंदिरे, पीर, मशिदी यांची व्यवस्था त्यांनी लावली. नव्याने बांधली, जुन्यांची डागडुजी केली. सभासद आपल्या बखरीत म्हणतो की, ‘‘मुलुखात देव देवस्थाने जाग जागा होती. त्यास दिवाबत्ती, नैवेद्य, अभिषेक, स्थान पाहू यथायोग्य चालविल. मुसलमानांचे पीर, मशिदी यांचे दिवाबत्ती, नैवेद्य स्थान पाहून चालविले.‘‘ महाराजांचे धर्म, संस्कृती रक्षणाचे व संवर्धनाचे उदिष्ठ्ये खऱ्या अर्थाने अहल्याबाईंनी पूर्णत्वास नेले. त्यांनी होळकरांच्या प्रदेशात किंवा फक्त मराठा राज्यातच नव्हे तर हिमालयापासून रामेश्वरापर्यंत संपूर्ण भारतखंडात हे कार्य केले. आक्रमकांनी देवस्थानांचा व तीर्थक्षेत्रांचा जो प्रचंड विध्वंस केला होता, त्यांच्या पुनरुज्जीवनाची देशव्यापी मोहीम अहल्याबाईंनी यशस्वी केली. याची साक्ष त्यांनी जीर्णोद्धार केलेली, नव्याने बांधलेली शेकडो मंदिरे, नद्यांवरील घाट, धर्मशाळा, विहिरी, कुंड, अन्नछत्रे आजही देत आहेत. मुस्लिमांच्या पीर, मशिदींनाही त्यानी इनामे, देणग्या देऊन त्यांचेही संवर्धन केले. अहल्याबाईंनी केलेल्या कार्याचा राजापासून रंकापर्यंत समाजातील सर्व घटकांना उपयोग झाला आहे. पुढेही होत राहणार आहे. राज्ये, साम्राज्ये लयास गेली; पण अहल्याबाईचे सांस्कृतिक साम्राज्य लयास गेले नाही. त्यांनी संपूर्ण भारतभर केलेली धार्मिक व लोकोपयोगी कामे म्हणजे केवळ पुण्यसंपादनासाठी केलेला खटाटोप नव्हता, त्यांच्या धार्मिकतेमागे भोळसर भावभक्ती नव्हती तर या धार्मिकतेला वेगळा आयाम होता. राष्ट्रीय दृष्टिकोण, सामाजिक ध्येय, धर्मसंस्कृतीची जोपासना, प्रवास व व्यापारास प्रोत्साहन, श्रमिक व कामगाराला हक्काची रोजीरोटी, भट-भिक्षुकांना उदरनिर्वाहाची सोय अशा कित्येक गोष्टी त्यातून साधल्या होत्या. थोडक्यात, राजकारण, प्रशासन, लष्करी व्यवस्थापन, प्रजाहित, परराष्ट्रधोरण, धर्मसहिष्णुता, धर्मसंस्कृतीचे संवर्धन या सर्वच दृष्टीकोणांतून पाहता छत्रपती शिवाजी महाराज आणि अहल्याबाई होळकर या दोन्ही महान व्यक्ती समर्थ व आदर्श राज्यकर्त्या होत्या. दोघांची पार्श्वभूमी, काळ, स्थान, जात, लिंग यात खूप अंतर असले तरी त्यांच्या ध्येयधोरणांत कमालीचे साम्य होते. त्यांची ध्येयधोरणे व कार्यप्रणाली कोणत्याही कालखंडात अनुकरणीय व आदर्श ठरते. म्हणूनच छत्रपती शिवाजी महाराज मराठी माणसाच्या मनातील देव्हारा बनले आहेत. या हिंदुस्थानात होऊन गेलेले श्रेष्ठ असे आदर्श राज्यकर्ते म्हणून ओळखले जातात. तर अहल्याबाईंना आजही लोकमाता या नावाने संपूर्ण देश ओळखत आहे. तसेच पुण्यश्लोक हे अभिधान प्राप्त झालेले अहल्याबाई होळकर हे जगातील एकमेव स्त्रीरत्न आहे.

**- प्रा. डॉ. शिवाजी वाघमोडे**







रयत समाचार Classified छोटी जाहिरात

छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक

**भाड्याने देणे**
परिचय हॉटेलजवळ, बालिकाश्रम रोडवर कॉर्पोरेट ऑफिस, बँक, शोरूम, क्लिनिक आदींसाठी ८०० स्क्वेअर फुटाचे दोन मजले बांधलेली जागा भाड्याने देणे आहे.
- संपर्क -
८८८८३४७४११

निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.

मे. रुपाली एजन्सी
फुड प्रॉडक्ट मटेरियल सप्लायर्स
राधिका लॉजजवळ, तापकीर लेन, आडत बाजार, अहमदनगर - ४१४००१.
(०२४१) २३४३०६०, ९८२२८४३०६०
ई-मेल - rupaliagency@gmail.com

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा

हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ, 7774001800, समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा, 9373021584, गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक, 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)

# पावसाची उघड; पेरणी कामांना वेग

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

गेल्या सहा सात दिवसांपासून पावसाने दिलेल्या उघडपीमुळे शेतीच्या कामांना वेग आला असून शेतीच्या पुर्व मशागतीचे कामे उरकून खरीप हंगामातील पेरणीच्या कामांना वेग घेतला आहे. तालुक्यांत यंदा मका,तुर, कापुस, उडीद पिकांकडे शेतकऱ्यांचा कल दिसत आहे.

अवकाळी पावसाने मागील दहा दिवसापूर्वी श्रीगोंदा तालुक्यात जोरदार अतिवृष्टी झाली. तब्बल आठ दिवस अवकाळी पावसाने मोठे थैमान घातले. पावसाच्या विश्रांती नंतर गेल्या दोन दिवसांपासून अचानक वातावरणात मोठा बदल होऊन ढगाळ वातावरण तयार होऊन पावसाच्या तुरळक सरी बरसल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. २५ मे रोजी रोहिणी नक्षत्र सुरू झाले आहे. आणि आता सात जून रोजी मृग नक्षत्रास प्रारंभ होत आहे रोहिणी नक्षत्रात अवकाळीने धुमाकूळ



घातल्यामुळे फळबागा,कांदा, भुईमुग पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

खरीप हंगामाच्या पेरणीसाठी जमिनीच्या मशागती पूर्व तयारी करून ठेवलेली असतानाच वातावरण पुन्हा ढगाळमय बनले गेले आहे. त्यामध्ये जोराचा अवकाळी बरसल्यामुळे अनेक शेतकऱ्यांच्या जमिनीचा वापसा झाला नाही.त्यामुळे शेतकरी जमिनीचा वापसा होण्याची वाट पाहत असतानाच पुन्हा पावसाचे वातावरण तयार झाल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे पावसाने पुन्हा जोर धरला तर खरीपाच्या पेरणी आणखी लांबणीवर पडण्याची शक्यता देखील निर्माण झाली आहे. अशा या वातावरणामुळे शेतकरी सध्या चिंतेंत आहेत. दरम्यान शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार चालू वर्षी पाऊस लवकर सुरू झाल्याने शेतकऱ्यांच्या खरीप हंगामाविषयी आशा पल्लवीत झाल्या आहेत. श्रीगोंदा तालुक्यात विशेषतः कुकडी लाभक्षेत्रात शेतकरी खरिपाची पिके मोठ्या प्रमाणावर घेतात.ही पिके कुकडी आवर्तनाच्या भरवशावर न राहता शेतकरी हे पावसाच्या धर्तीवर उत्पन्न घेतात. त्यातून शेतकऱ्यांना थोडी आर्थिक उन्नती मिळते. त्यामुळे खरीप हंगाम हा शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्त्वाचा समजला जातो. परंतु हवामान विभागाने मात्र दहा–बारा जून रोजी वेगवान वाऱ्यासह पावसाचा मोठा अंदाज व्यक्त केल्याने शेतकरी आणखी चिंतेत पडले आहेत. सद्यस्थितीला तालुक्यात अनेक शेतकऱ्यांनी खरिपाच्या पेरण्या व कपाशीच्या लागवडी सुरू केल्या आहेत. परंतु वातावरणातील बदल हा शेतकऱ्यांसाठी अडथळा निर्माण होत असल्याच्या भावना देखील शेतकऱ्यांनी व्यक्त केल्या आहेत. त्यामध्ये कधी ऊन तर कधी ढगाळ वातावरण अशा परिस्थितीतून शेतकरी सध्या मार्गक्रमण करत असल्याचे चित्र संपूर्ण श्रीगोंदा तालुक्यात दिसुन येत आहे.



# मनोज जरांगे यांची जामखेडला धावती भेट

**जामखेड । रिजवान शेख**

मराठा आरक्षणासाठी संघर्ष करणारे नेते मनोज जरांगे पाटील यांचे जामखेड येथे जोरदार स्वागत करण्यात आले. पुणे येथून रायगडला जात असताना त्यांच्या ताफ्याचा प्रवास पाटोदाजामखेड मार्गे होत होता. या निमित्ताने जामखेड तालुक्यातील मराठा आरक्षणासाठी कार्यरत असलेल्या सकल मराठा समाजाच्या वतीने त्यांचे भव्य स्वागत करण्यात आले. या दौऱ्यात मनोज जरांगे पाटील यांनी मंगेश आजबे यांच्या कार्यालयाला भेट देऊन मराठा आंदोलनात सहभागी असलेल्या कार्यकर्त्यांशी संवाद साधला आणि त्यांच्या भावना जाणून घेतल्या. तसेच उपस्थितांनी त्यांचा यथोचित सत्कार केला. या प्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार गट) चे जामखेड तालुका अध्यक्ष विजयसिंह गोलेकर, सुंदरदास बिरंगळ, गणेश चव्हाण आणि इतर अनेक कार्यकर्ते, समाजबांधव उपस्थित होते. मनोज जरांगे पाटील नियोजित दौऱ्यानुसार पाटोदाजामखेडपुणे मार्गे रायगड येथे प्रस्थान करत आहेत. त्यांच्या या दौऱ्यामुळे मराठा आरक्षणाच्या आंदोलनाला अधिक बळ मिळेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.



# मख़दुम सोसायटी, रहमत सुलतान फाउंडेशनतर्फे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना अभिवादन

**अहमदनगर । आबीद खान**

भारतीय इतिहासात अनेक मोठी युद्धे झाली, साम्राज्ये उभी राहिली आणि कोसळली. मात्र, या सर्व घडामोडींमध्ये काही व्यक्तींनी समाजहित आणि जनकल्याणाच्या मूल्यांना सर्वोच्च स्थान दिले. अशा थोर व्यक्तींमध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. अहिल्यादेवींच्या जीवनकार्याने हे सिद्ध केले की एका स्त्रीचे नेतृत्व केवळ राजसिंहासनापुरते मर्यादित राहत नाही, तर ते समाजाच्या प्रत्येक स्तरांपर्यंत पोहोचते. त्या केवळ इंदूरच्या होळकर घराण्याच्या महाराणी नव्हत्या, तर एक न्यायप्रिय नेत्या, समाजसुधारक आणि स्त्री सक्षमीकरणाच्या आद्य प्रवर्तक होत्या. त्यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त ख़दुम एज्युकेशन ॲण्ड वेल्फेअर सोसायटी व रहमत सुलतान फाउंडेशनच्या वतीने त्यांना अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमात रहमत सुलतान फाउंडेशनचे अध्यक्ष युनूसभाई तांबटकर यांनी अहिल्यादेवींच्या कार्याची आठवण करून देत असे प्रतिपादन केले की, ''अहिल्यादेवींच्या विचारांमधून आजच्या समाजाला नव्या प्रेरणेची आवश्यकता आहे.'' कार्यक्रमात ॲड. हनीफ बाबूजी, जीवन फाउंडेशनचे अध्यक्ष आरिफ सय्यद, अहमदनगर इतिहासप्रेमी मंडळाचे आसिफ दुलेखान, जिल्हा उर्दू साहित्य परिषदेच्या सहसचिव डॉ. कमर सुरूर, उर्जिता फाउंडेशनच्या संध्या मेढे, तसेच राजाभय्या, जावेद मास्टर, अबरार शेख आदी मान्यवर उपस्थित होते. या वेळी डॉ. कमर सुरूर व संध्या मेढे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन आबीद दुलेखान यांनी केले तर आभार आरिफ सय्यद यांनी मानले. कार्यक्रमास ख़दुम सोसायटी, रहमत सुलतान फाउंडेशन व अहमदनगर इतिहासप्रेमी मंडळ यांचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# काव्ययोग काव्यकरंडक स्पर्धेत पुनम राऊत यांचे यश

**शेवगाव । लक्ष्मण मडके**

अहिल्यानगर जिल्ह्यातील शेवगाव तालुक्यातील बोधेगाव येथील जिपप्राशा अंतरवाली बुद्रुक या प्राथमिक शाळेत सहशिक्षिका या पदावर कार्यरत असणाऱ्या पुनम पांडुरंग राऊत यांनी काव्ययोग काव्य संस्था पुणे, आयोजित काव्य काव्य करंडक काव्य वाचन स्पर्धा २०२५ या स्पर्धेत सहभाग घेऊन प्रथम क्रमांक पटकावल्याबद्दल पुण्यामध्ये सत्कार करण्यात आला. पुण्यातील काव्ययोग काव्यसंस्थेने काव्य काव्य करंडक काव्य वाचन स्पर्धा २०२५ काव्यवाचन स्पर्धा खास नवोदित कवींसाठी आयोजित करण्यात आली होती. ही स्पर्धा लाईक शेअर कमेंट यावर आधारित होती. पुनम राऊत यांनी देखील या काव्य स्पर्धेत सहभागी होऊन इंटरनेटचा जमाना ही कविता सादर केली. या कवितेत त्यांनी अगदी लहान मुलांपासून ते थोरामोठ्यांपर्यंत सर्वजण मोबाईलच्या विळख्यात कसे अडकले आहेत याचे अगदी सोप्या



शब्दात यथार्थ वर्णन केले आहे. मोबाईलच्या जाळ्यात अडकलेला माणूस नाती विसरत चालला आहे हे त्यांनी आपल्या कवितेतून मांडले आहे तसेच ''प्रश्न एकच पडला इंटरनेटमुळे माणसं माणसापासून दुरावली की जग जवळ आले?'' हा खडा सवाल त्यांनी आपल्या कवितेतून केला आहे .....त्यांची ही कविता जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचली. बऱ्याच जणांनी लाइक्स,शेअर्स, कमेंट करून या कवितेला प्रथम क्रमांक मिळवून दिला. दिनांक २५ मे रोजी पुण्यात काव्ययोग काव्यसंस्थेमार्फत त्यांचा सत्कार करण्यात आला. त्यांच्या या यशाचे खरे भागिदार त्यांचे कुटुंब,मित्र परिवार,शिक्षक बंधू भगिनी आहेत कारण त्यांच्या विश्वास, प्रेम आणि सहकार्याने त्यांना हे यश मिळाले. त्यांच्या लेखणीला असेच यश मिळत राहो. काव्ययोग काव्यसंस्था सारख्या संस्था ज्या कलाकारांना एक हक्काचं व्यासपीठ मिळवून देतात अश्या संस्था घडत राहो. संस्थेचे सर्वेसर्वा योगेश हरणे व राजयोग संस्थेचे अध्यक्ष गौरव पुंडे यांच्या सुंदर नियोजनातून या स्पर्धेचा पारितोषिक वितरण व पुरस्कार वितरणाचा सोहळा २५ मे २०२५ रोजी भावे हायस्कूल परीसर, सदाशिव पेठ, पुणे येथे पार पडला. या कार्यक्रमाला वसुधा नाईक, प्रा. शरदचंद्र काकडे, डॉ. शैलेंद्र भणगे, चैताली कापसे, विलास बाबर, श्रीराम घडे व प्रमोद सुर्यवंशी हे मान्यवर पाहुणे उपस्थित होते. त्यांच्याहस्ते विजेत्यांचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीशैल सुतार यांनी मोठ्या खुबीने खेळीमेळीच्या वातावरणात केले.

# गावोगावी पर्यावरण परिषदांचे आयोजन व्हावे- डॉ. प्रियदर्शिनी कर्वे

**नगरतालुका । प्रतिनिधी**

जागतिक पातळीवर पर्यावरण विषयक परिषदा होतात. पण त्यामुळे सामान्य माणसांच्या आयुष्यात तातडीनं बदल घडत नाही. मात्र, ग्रामीण भागात झालेल्या परिषदेमुळे आपल्या परिसरात बदल हा झपाट्याने होईल. त्यातून पर्यावरण संवर्धनाच्या कार्याला गती मिळेल. त्यामुळे अशा पर्यावरण विषयक परिषदांचे गावोगावी आयोजन व्हावे, असे मत जागतिक कीर्तीच्या पर्यावरण तज्ज्ञ डॉ. प्रियदर्शिनी कर्वे यांनी व्यक्त केले. पर्यावरण दिनानिमित्त आत्मनिर्धार फाऊंडेशन संचलित पर्यावरण संवर्धन समितीच्या वतीने आयोजित इसळक येथे ग्रामीण भागातील पहिल्या पर्यावरण परिषदेच्या उद्घाटन सत्राच्या उद्घाटक म्हणून त्या बोलत होत्या. आत्मनिर्धार फाऊंडेशनचे अध्यक्ष महादेव गवळी यांनी प्रास्ताविकात फाउंडेशनच्या कामकाजाचा आढावा घेत आगामी काळात काय करणार आहोत हे उपस्थितांसमोर मांडले. आपल्या परिसरातील पर्यावरणप्रेमी कार्यकर्त्यांचे संघटन करून कृती कार्यक्रम हाती घेण्यासाठी आजची परिषद महत्त्वाची ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी वॉटरमॅन रमेश खरमाळे, सामाजिक वनीकरणचे विभागीय वन अधिकारी सचिन कंद, प्रा.डॉ. मेहबूब सय्यद




यांच्यासह पर्यावरणप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. परिषदेचे अध्यक्षस्थान ज्येष्ठ प्रबोधनकार हभप भगवान घुगे शास्त्री यांनी भूषविले. यावेळी बोलताना डॉ. कर्वे पुढे म्हणाल्या की, पर्यावरण संवर्धन म्हणजे निव्वळ वृक्ष लागवड नसून गवताच्या पात्यापासून ते झाडांपर्यंत सर्वांचंच संवर्धन म्हणजे खऱ्या अर्थाने पर्यावरण संवर्धन होय. पर्यावरण संवर्धनासाठी डॉ. कर्वे यांनी परिषदे दरम्यान काही उपायोजना सुचवल्या. शालेय स्तरावर हवामान नोंदी ठेवण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिल्यास प्रत्येक भागात स्वतः चे असे वेदर स्टेशनस् उभे राहतील. गावाबाहेरून गावात येणाऱ्या छोट्या वस्तूंची निर्मिती सुरू केल्यास पॅकेजिंगसाठी लागणारे प्लास्टिक कमी होण्यास मदत होईल. कारखान्यामधून येणारं सांडपाणी प्रक्रिया करूनच सोडलं जातय की नाही हे पाहणे, ही लोकांची जबाबदारी आहे. लोकप्रतिनिधी हे जनतेचे नेते नसून जनतेचे अनुयायी आहेत. त्यामुळे लोकप्रतिनिधींवर पर्यावरणप्रेमींचा दबावगट निर्माण करण्याचे काम या परिषदांमधून होईल, असा विश्वास त्यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला. वॉटरमॅन रमेश खरमाळे यांनी प्लास्टिकचे दुष्परिणाम विविध उदाहरणांच्या माध्यमातून विशद केले. कार्बन डायऑक्साइडचे वातावरणातील प्रमाण वाढत असून पर्यावरण संवर्धनासाठी तातडीनं उपाययोजना कराव्या लागणार असल्याबाबत गांभीर्यपूर्वक मांडणी केली. अन्यथा मानव जातीच्या अस्तित्वाला धोका निर्माण होणार असल्याचा इशारा दिला. पावसाळ्याच्या पूर्वीच जमिनीत काही क्षेत्रात चर खोदून पाणी जमिनीत जिरवल्यास भूजल पातळी वाढून पठार भागावर नंदनवन फुलेल, असेही ते म्हणाले. विभागीय वनाधिकारी सचिन कंद यांचेही यावेळी भाषण झाले. या परिषदेला पर्यावरणप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.आपल्या परिसरातील पर्यावरणपूरक कार्यक्रम हाती घेण्यासाठी कार्यकर्त्यांचे चर्चासत्राचे आयोजन केले होते. या चर्चासत्रात संदीप महाराज कळसे, अमित गायकवाड, रामदास कोतकर, सागर दाणी, बलभीम निमसे, संतोष घोलप, सतीश गेरंगे, राज ठोंबरे, संजय म्हस्के, प्रिया कोठारी यांनी सहभाग नोंदवला. यावेळी पर्यावरणप्रेमींनी विविध सूचना मांडल्या. या सूचनांची नोंद घेऊन आगामी काळात चिंतन बैठकीचे आयोजन करून कृतिकार्यक्रमाची घोषणा केली जाईल, अशी माहिती समन्वयक ॲड. राहुल ठाणगे यांनी दिली.

परिषदेचे सूत्रसंवादक म्हणून सुनिल जाजगे, दादासाहेब घोलप यांनी काम पाहिले. पर्यावरण संवर्धन समितीचे अध्यक्ष भानुदास कोतकर यांनी आभार मानले. यावेळी त्रिदल संघटनेचे एकनाथ आडसुरे, लेखक सचिन मोहन चोभे, ह.भ.प. सिद्धनाथ मेटे, संगिता जाजगे, संध्या मेढे, सतीश सातपुते, अंकुश शेळके, बाळासाहेब खपके, उद्योजक अजय लामखडे, डॉ.दिलीप पवार, संजय गेरंगे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संदीप गेरंगे, संभाजी सोनवणे, मच्छिंद्र म्हस्के, ज्ञानेश्वर डहाळे, रविंद्र पवार यांनी मेहनत घेतली.




# बाबुजी आव्हाड महाविद्यालयाचे तुकाईमाता डोंगर परिसरात बिजारोपण

## जागतिक पर्यावरण दिनाचा अभिनव उपक्रम

**पाथर्डी । प्रतिनिधी**

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून येथील बाबुजी आव्हाड महाविद्यालयाकडून हंडाळवाडी शिवारातील तुकाईमाता डोंगर परिसरात विविध प्रजातीच्या वनस्पतीचे बिजरोपण करण्यात आले.यामध्ये लिंब, करंज, सीताफळ, चिंच, बोर आदी वनस्पती बिजांचा समावेश होता.

यावेळी सुमारे पाच हजारपेक्षा जास्त बीज रोपण करण्यात आले.यावेळी मार्गदर्शन करतांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बबन चौरे यांनी वनस्पतींचे सामाजिक व पर्यावरणीय महत्व पटवून दिले.ते म्हणाले, पर्यावरणाचे संवर्धन करणे हे प्रत्येक नागरिकाची महत्त्वाची जबाबदारी आहे.सध्या प्रचंड वृक्षतोडी मुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत चालला आहे.दिवसेंदिवस पावसाचे प्रमाण कमी होत असून दुष्काळी परिस्थिती निर्माण होत आहे.पर्यावरणातील अनेक औषधी वनस्पती नष्ट होत आहेत.तसेच वन्य जीवांचे ही प्रमाण कमी होत आहे.प्रदूषणासारख्या गंभीर समस्या निर्माण होत आहेत.

त्यामुळे सामाजिक स्वास्थ्यावर विपरीत परिणाम होत आहे.मानवी सामाजिक स्वास्थ्य टिकवून ठेवायचे असेल तर पर्यावरणाचे संवर्धन व संगोपन करणे हे अत्यंत आवश्यक आहे. प्रत्येक व्यक्तीने एक तरी झाड लावून त्याची काळजी घेण्याचा संकल्प आजच्या पर्यावरण दिनी करावा असे आवाहन त्यांनी यावेळी केले.बिजरोपण कार्यक्रमास राष्ट्रीय छात्र सेनेचे कॅडेट्स, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, विद्यार्थी व प्राध्यापक उपस्थित होते.या कार्यक्रमाचे संयोजन एन एस एस विभाग प्रमुख डॉ.अरुण राख,प्रा.आनंद घोंगडे, एन सी सी विभाग प्रमुख कॅप्टन डॉ.अजयकुमार पालवे,ग्रंथपाल डॉ. किरण गुलदगड यांनी केले.

# विठोजीराजे होळकरांची एवढी क्रुर हत्या का?

अन्यायी - अत्याचारी राजव्यवस्थांविरुद्धचे उठाव जगाला नवे नाहीत. छत्रपती शिवाजी महाराजांनीही, प्रसंगी आप्तस्वकियांशीही संघर्ष करत मोगल राज्यव्यवस्थेविरुद्ध उठाव करुन स्वराज्याची स्थापना केली होती. सर्वच उठाव यशस्वी होत नाहीत. अयशस्वी बंडखोरांना पकडुन कैदेत टाकने अथवा ठार मारल्याच्या घटनाही अगणित आहेत. परंतु अशाच स्वातंत्र्यासाठी उठाव केलेल्या विठोजीराजे होळकर यांना मात्र जी कृरातिकृर शिक्षा दिली गेली तिला ग. ह. खरेंसारख्या इतिहास संशोधकानेही ‘‘अत्यंत नीच दर्जाचा खुनशी सुड‘‘ असे संबोधले आहे, कारण जगाच्या इतिहासात अशी शिक्षा कोणालाही दिली गेल्याचे उदाहरण नाही.

का दिली गेली अशी शिक्षा? काय पार्श्वभुमी आहे या शिक्षेची? या प्रश्नांची उत्तरे मिळवण्यासाठी थोडे इतिहासात जावे लागेल. तुकोजीराजे होळकरांच्या मृत्युनंतर होळकरांची सर्व संस्थाने हडपण्याचा दुसरा बाजीराव व दौलतराव शिंद्यांनी घाट घातला. त्याची सुरुवात म्हणुन दुसरे मल्हारराव होळकर या पराक्रमी वारसाची पुणे येथे मारेकरी घालुन १४ सप्टेंबर १७९७ रोजी पुणे येथे मल्हाररावांची हत्या केली गेली. विठोजीराजे व यशवंतराव होळकर या भावंडांना जीव वाचवण्यासाठी अक्षरश: पळुन जावे लागले. सारी होळकरी संस्थाने दौलतरावाने घशात घातल्याने ती पुन्हा जिंकुन घेण्याखेरीज यशवंतरावांसमोर पर्याय राहिला नाही. खानदेशात मुक्कामी असता खुद्द नाना फडणविसाने होळकर बंधुंना साकडे घातले की, बाजीरावाच्या नादानीने रयतेची रया गेली आहे. दौलतरावाचे पेंढारी सर्वत्र रयतेचीच लुट करत आहेत. सामान्य स्त्रीयांचीच काय सरदारांच्या बायकांची अब्रुही शनिवारवाड्यात लुटली जात आहे, तेंव्हा दुसऱ्या बाजीरावास हटवुन अमृतरावास अथवा मनास येईल त्यास पेशवा करावे व रयतेला सुखाचे दिवस दाखवावेत. मराठेशाहीत खुद्द पेशवाच लुट करत होता. स्वत: होळकरांनी हा अन्याय डोळ्यांनी प्रत्यक्ष पाहिला असल्याने व त्या दोघा भावंडांच्या बायका व नवजात मुलेच नव्हे तर होळकरी गादीचा वारस अल्पवयीन खंडेरावही शिंद्यांच्या कैदेत असल्याने त्यांच्याही मनात बाजीरावाबद्दल चीड होतीच. परंतु आधी उत्तर हिंदुस्तान स्वतंत्र करायचा हे यशवंतरावांचे ध्येय असल्याने त्यांनी दक्षिणेची जबाबदारी विठोजीराजेंवर सोपवली. त्यानुसार विठोजीराजे अवघी तीन-चारशे स्वारांची फौज घेवुन पुण्याकडे निघाले. वाटेत त्यांना अनेक असंतुष्ट छोटे-मोठे सरदारही सामील झाले. मग विठोजीराजेंनी एकामागुन एक पेशवे व शिंद्यांची ठाणी ताब्यात घ्यायला सुरुवात केली. कर्नाटक ते पार आंध्रापर्यंत धडका मारल्या. संपुर्ण महाराष्ट्र पेटला. खुद्द अमृतराव पेशव्यांनी विठोजीराजेंना सनदा लिहुन दिल्या. नाना फडणविसाचा मागुन पाठिंबा होताच. या प्रकाराने हबकलेल्या पेशव्याने नानाला अटक करुन मग बालकृष्ण बावनपागे या सरदारास प्रथम विठोजीराजेंवर पाठवले. परंतु खुद्द बावनपागेंचा बाजीरावाच्या अन्यायी वर्तनाचा रोष असल्याने ते विठोजीराजेंनाच सामील झाले. याशिवाय येसाजी रामकृष्ण, बाजीबा व कृष्णराव मोदी असे अनेक शिंद्यांचे सरदारही येवुन सामील झाले. या सर्वांचे नेतृत्व स्विकारत विठोजीराजेंनी सोलापुर, करकुंभ, पंढरपुर अशी अनेक स्थाने त्यांनी मुक्त केली. दरम्यान बाजीरावाने सरदार पानशांना विठोजीराजांचे व त्यांना सामील सरदारांचे पारिपत्य करायला पाठवले. पण सोलापुर येथे विठोजीराजांनी पानशांचा पुर्ण पराभव केला. इतका की पानशांना तोफखाना सोडून पळुन जावे लागले. हीच गत बाळाजीपंत पटवर्धन या पेशव्याच्या सरदाराची झाली. आता आपली पेशवाई रहात नाही, हे लक्षात येताच बाजीरावाने १८०० च्या डिसेंबरमध्येच इंग्रज रेसिडेंट क्लोजमार्फत इंग्रजांचे संरक्षण मिळवायचा प्रयत्न सुरु केला. हे समजल्यावर विठोजीराजे अजुनच चवताळले...त्यात नाना फडणविसाला बाजीरावाच्या छळामुळे मृत्यु झाला होता. त्याच्या विधवेला कैदेत टाकुन त्याची सारी संपत्ती जप्त केली होती. सारी जनता व सरदारही नाराज झालेले होते. अशात इंग्रजांशी पेशव्याने करार केला तर स्वराज्य बुडाले, हे विठोजीराजांना समजत होते. यशवंतराव होळकरही या वृत्ताने अस्वस्थ झाले.

**- संजय सोनवणी**

त्यांच्या सल्ल्याने विठोजीराजे वेगाने पुण्याच्या दिशेने निघाले. बाजीराव हे वृत्त समजताच घाबरला. त्याने तातडीने नाना पुरंदरे, गणपतराव पानसे व बापु गोखले या मातब्बर सरदारांना सर्व फौजेनुसार विठोजीराजेंना अटकाव करण्यास पाठवले. मार्च १८०१ मधे जेजुरीजवळ उभयपक्षांमधे घमासान युद्ध झाले. या युद्धात विठोजीराजेंचा पराजय झाला. त्यांना अटक करुन पुण्यात आणण्यात आले. विठोजींना क्रुर शिक्षा द्यायचा दुसऱ्या बाजीरावाचा बेत आहे हे समजताच नरसिंह विंचुरकर हे मातब्बर सरदार धावत बाजीरावास भेटण्यास आले व विठोजीराजांना मारु नये, अशी विनवणी केली. पण रियासतकार सरदेसाई यांच्याच शब्दात सांगायचे म्हणजे...‘‘ परंतु व्यसनांध मनुष्याप्रमाणे बाजीरावाने विंचुरकरांचे म्हणणे झिडकारले....‘‘ बाजीराव त्याकाळी सर्वस्वी सर्जेराव घाटगे, बाळोबा कुंजीर व दौलतरावाच्या आहारी गेलेला होता. त्याने विठोजीराजेंना शिक्षा काय द्यायची याची विकृत आखणी करुन ठेवलेली होती. अवघ्या सत्ताविस वर्षांच्या विठोजीराजेंना १६ एप्रिल १८०१ रोजी शनिवारवाड्यासमोर आणले गेले. बेड्या तोडल्या व अपमानित करत मार-मार मारले. मग वेळूच्या फोकाने (कमचा) पाठीवर दोनशे फटके मारले. हे दृष्य त्यांची पत्नी व कोवळा मुलगा असहाय्यपणे पहात, वर नगारखान्यात बसलेल्या व या दृष्याची मौज घेणाऱ्या बाजीरावाला, आक्रोश करत विठोजीराजांचा छळ करु नये अशा विनवण्या करत होती. पुणेकर हतबुद्ध होवुन हे दृष्य पहात होते...पण बाजीरावाला दया आली नाही. वेळुच्या फोकाने मारुन झाल्यावर विठोजीराजांना हत्तीच्या पायी बांधण्यात आले...संपुर्ण शनिवारवाड्याभोवती फरफटवत प्रदक्षणा घालण्यात आली. या दृष्याचा तत्कालीन एक लेख सांगतो की एवढा मार बसुन वा फरफटवले जात असतांनाही विठोजीराजांनी कसलीही दयेची भीक मागितली नाही. पुन्हा शनिवारवाड्यासमोर आल्यानंतर जसा बाजीरावाने इशारा केला, हत्तीच्या पायाखाली त्यांचे मस्तक-शरीर चिरडुन त्यांना ठार मारण्यात आले. ही विटंबना येथेच संपली नाही. आपल्या दृष्टीसुखासाठी बाजीरावाने विठोजीराजेंचे छिन्न-भिन्न प्रेत तसेच २४ तास शनिवारवाड्यासमोर उघड्यावर पडू दिले. खरे तर पेशवाईच्या अस्ताची ही मृत्युघंटा होती. विठोजीराजांचे क्रियाकर्म त्यांच्या कारभाऱ्यांच्या विनवण्यानंतर करायला परवानगी मिळाली. पत्नीला सहगमन करण्याची परवानगी नाकारुन तिला पुन्हा कैदेत टाकण्यात आले. तिची व आपल्या पत्नीची मुक्तता नंतर यशवंतरावांनी केली.

का? बाजीराव हा मुळात खुनी राघोबादादाचा पोरगा. राघोबादादाने कोवळ्या वयाच्या नारायणराव पेशव्याचा खुन घडवुन आणला. सवाई माधवराव वेडाच्या भरात आत्महत्या करुन मेला. बाजीरावाचे बालपण कैदेतच गेले...कारण बापाचे पाप. त्याला पेशवाई मिळाली ती दौलतराव शिंद्यांमुळे. दौलतरावही स्वार्थी. समानशीलेशु अशी युती जुळाली. बाजीरावाचा स्वभाव संशयी. तो विषयांध एवढा कि कोणा सरदाराची स्त्री त्याने सोडली नाही. त्याचा सासरा सर्जेराव घाटगेही त्याला स्त्रीया पुरवायचा धंदा करायचा. अहिल्याबाईंवर चालुन जात त्यांची संस्थाने जिंकुन घ्यायचा अयशस्वी पराक्रम राघोबादादाने केला होताच. त्यांचा व नंतर तुकोजीराजेंचा मृत्यु झाल्यानंतर आता तरी होळकरी संस्थाने हडपता येतील हा बाजीराव व दौलतरावाचा होरा होता. त्यासाठी त्यांनी काशीराव या अत्यंत दुर्बळ वारसाला हाती धरत दुसऱ्या मल्हाररावाची हत्या केली. यशवंतराव व विठोजीराजेंना आपण हा हा म्हणता नेस्तनाबुत करु याचा त्यांना विश्वास होता. पण तसे व्हायचे नव्हते. उत्तरेत यशवंतरावांनी शिंद्यांचा धुव्वा उडवायला सुरुवात केली तर इकडे विठोजीराजेंनी महाराष्ट्रात खुद्द पेशव्यावर संक्रांत आणली. शिंदे व पेशव्यांचे जवळपास अकरा सरदार विठोजीराजेंना मिळाले. त्यात नाना सारख्या मुत्सद्द्याचा त्यांना पाठिंबा. असे घडत राहिले तर आपली पेशवाई गेल्यात जमा आहे हे न समजण्याएवढा बाजीराव मुर्ख नव्हता. सन अठराशेत नानाचा त्याच्या छळानेच मृत्यु झाला असला तरी नानाचे समर्थक राज्यभर हयात होतेच व त्यांचा अप्रत्यक्ष प्रत्यक्ष पाठिंबा विठोजीराजेंच्या उठावाला होताच! विठोजी पराक्रमी आहे हे त्याने अनुभवले होतेच. त्याच्या सरदारांतही गळती सुरु झालेली होतीच. अशात त्याच्या सुदैवाने विठोजीराजे त्याच्या हाती लागल्यानंतर त्याने संपुर्ण उठाव चिरडण्यासाठी या क्रुर हत्येचा निर्णय बाळोबा कुंजराच्या सल्ल्याने घेतलेला दिसतो. पण हा निर्णय त्याला नव्हे...तर स्वराज्यालाच महाग पडला. त्याने अवघा महाराष्ट्र दुखावला. स्वराज्यावरचे लोकांचे प्रेम संपले. महारक्ख समाज तर बाजीरावाच्या भयंकर जाचाने तुटला होताच. यशवंतरावांसारख्या महामानी माणसाला दुखावले...यशवंतरावांनी बाजीरावाला पुण्यातुन पळुन जायला लावले. यशवंतराव दयाळु म्हणुन बाजीराव वाचला...अन्यथा बाजीरावाचा अंत यशवंतराव लीलया घडवुन आणु शकत होते...आणि त्यांना अटकाव करु शकेल अशी शक्ती त्यावेळी इंग्रजांहातीसुद्धा नव्हती...महारक्खांनी मग १८१८ च्या भीमा कोरेगांवच्या लढाईत त्याचा पुरेपुर सुड घेतला... पळपुटा बाजीराव पळत सुटला तो सुटलाच... नारायणरावाच्या भुताने शेवटी त्याला त्रस्त केले. कर्नल मनोहर माळगांवकर म्हनतात...एवढा क्रुर, सुडी, निघ्रुण प्रव्रुत्तीचा पेशवा मराठेशाहीला लाभावा हे मराठी साम्राज्याचे दुर्दैव होय...आणि ते खरेच आहे. विठोजीराजांना क्रुरपणे मारण्याच्या बाजीरावाच्या या नादान कृतीमुळे स्वराज्य एका रयतेच्या हिताची चाड असनाऱ्या स्वातंत्र्यप्रेमी महावीरास मुकले. ‘‘तुकोजी होळकराचे तिन्ही मुलगे पराक्रमी असता त्यांचा उपयोग बाजीरावाने राष्ट्रकार्यासाठी केला नाही, हे पाहुन उद्वेग वाटतो...‘‘ हे रियासतकारांचे मत अत्यंत योग्य असेच आहे.

***(ता. १६ एप्रिल २०१२ रोजी विठोजीराजे होळकर या स्वातंत्र्यप्रेमी उठावकर्त्याला क्रुरपणे ठार मारल्याचा २११ वा बलिदान दिन...हे का आणि कसे झाले यावर प्रकाश टाकणारा हा लेख!)***

# छत्रपति शिवाजी महाराज यांच्या अष्टनायिका

१ तंजावर शहरीं एका गृहस्थाच्या दफ्तरांत खालील टिपण सांपडलें. ह्या टिपणांत थोरले शिवाजी महाराज ह्यांच्या बायकांचीं व त्या बायकां- पासून झालेल्या संततीची नावे दिली आहेत. ग्रांट डफ यास तीन स्त्रियांचींच नावें माहीत होतीं. ज्यांच्या पुस्तकावरून ग्रांट डफने आपली बखर अंशतः रचली त्या मल्हार रामरावासहि तीन स्त्रियांचीं नावें माहीत होती. रामदासस्वामींच्या बखरीत चार स्त्रियांचीं नावे दिलीं आहेत. मराठ्यांच्या इतिहासाच्या चवथ्या खंडाच्या प्रस्तावनेंत मीहि चार स्त्रियांची नावें दिलीं होतीं. प्रस्तुत टिपणावरून असे दिसते कीं, शिवाजीस एकंदर आठ बायका, सहा मुली व दोन मुलगे होते. पैकीं मुलांची नावे प्रसिद्ध आहेत. अलीकडील पाच सहा वर्षाच्या शोषांत फक्त दोन तीन मुलींचीं नावे तेवढीं कळलीं होतीं. प्रस्तुत टिपणावरून शिवाजीच्या संततीपैकी बहुतेकांचीं नावे कळली असे दिसते. २ प्रस्तुत टिपण अर्धेमुर्धे असून त्याचे पहिले व शेवटले बंद गहाळ झाले आहेत. टिपण जुन्या कागदावर मोडींत लिहिले असून बरेंच विश्वसनीय आहे. टिपण येणेप्रमाणें आहे :- राजांनी ते दस्तक मानून, या उभयता वजिरासहि घेऊन तंजाउरचे वकिलांहीं एकोजीराजास कुमकेस्तव प्रार्थना केली. तेव्हां एकोजी राजे सकळ सैन्यानिशीं कुमकेस येतांना वाटेस अरणीचे राज्य साधून, वेदाजी भास्कर यांस अरणीचे किल्यांत ठेऊन, तंजाउरास येऊन, त्रिचनापल्ली- च्यांती युद्ध करून, त्यांस पळवून, तंजाउरच्यांस मोकळीक करून, आपण बेंगरुळास प्रयाण करून, तिरमळवाडींत राहिले. तेव्हां त्यांची स्त्री दीपाबाई सौभाग्यवती पूर्णगर्भीण समागमें होती. एकोजीराजे तिरमळवाडीस उतरले तेव्हां दीपाबाई सौभाग्यवतीस प्रसवकाळ होऊन, एकोजीराजांस द्वितीय पुत्र शके १५९६ राक्षस संवत्सरी तिसरे सरफोजीराजे जाले. तेव्हां एकोजीराजांस सैन्यांत देवांनी येऊन सांगितलें जे, तुझीं तंजाऊर राज्य सोडून जाऊं नका, तुमचे वर्षपरंपरेनें हे राज्य भोगावयास कारण आहे, उद्यां



पहाटेस तुह्मास संविधान होईल. म्हणून सांगितले. तैसेंच, दूसरे दिवशीं तंजाउराहून योग्यायोग्य चर्चेमुळे एकास एक भेद पडून, अमात्यपद करणारहि बिघडून, तिरमळवाडीस होते त्या ऐकोजीराजांस तुम्ही हें राज्य परिपालन करावें ह्मणून प्रार्थिले. ईश्वरसंकल्पास टाळतां न ये म्हणून अंगीकार करून एकोजीराजांहीं तंजाउर किल्ल्यांत प्रवेश केला. पुढें विस्तारेंकडून तंजाऊर प्रांती या वंशाचे राजे जाले ते प्रकरण लिहिण्यांत येईल. २ पुणे प्रांतीं सकळ दिग्विजय करून राहिलेल्या शिवाजीराजांस अष्टनायिका त्यांची नावेः-

१ सो सईबाई निंबाळकरांची, २ काशीबाई जाधवांची, ३ सकवारबाई गायकवाडांची, ४ पुतळाबाई पालकरांची, ५ सगुणाबाई शिरक्यांची, ६ सोयराबाई मोहित्यांची, ७ फंर्जदांची लेकी, ८ विचाऱ्यांची लेकी.

या अष्टनायकांसमवेत शिवाजीराजे सुख भोगीत असतां वडील सईबाईचे पोटीं तिघी कन्या व एक पुत्र जन्मले त्यांचें नांव संभाजीराजे म्हणून ठेविलें. त्या संभाजी राजाचें शक १५७९ त जालें. तिघी कन्या. पैकी प्रथम कन्या सकवारबाईस निंबाळकराचे घरी दिल्हें, दुसरी कन्या राणूबाईस जाधवाचे घरी दिल्हें, तिसरी कन्या अंबिकाबाईस महाडिकांचे घरीं दिल्हें. त्या हरजी महाडिकाप्तच चंजीप्रांती कितेक जहागिरीहि दिल्ह्या. दुसरी स्त्री, काशीबाईसाहेबास संतति नाहीं. तिसरी स्त्री, सखवारबाईसाहेबास कमळाबाई म्हणून एक कन्या, ते पालकर नेतोजीस दिल्ही. चौथी, पुतळाबाईसाहेबांस संतति नाहीं. पांचवी, सगुणाबाईसाहेबांस राजकुवरबाई ह्मणून कन्या जाली ते गणोजी शिर्के यांस दिल्ही. साहवी स्त्री, सोयराबाईसाहेबांस एक पुत्र जन्मला त्यास राजारामराजे म्हणून नांव ठेविलें, दुसरी कन्या बाळीबाई. तदनंतर, शिवाजीराजे यांनी आपले ज्येष्ठ पुत्र संभाजीराजे यांस शके १५९८ त आपले स्वराज्य पुणे प्रांत तक्त देऊन धाकटे पुत्र राजाराम यांस प्रथम चंदीचे राज्य दिलें. सवेंच महत्कलह पडून पुणेप्रांत यवनाक्रांत जाल्यावेळेस राजाराम चंदीहून निघून तंजावरचे किल्यांतहि थोडे दिवस भावापासी असून उपरि शिवाजी राजांनी बलावू पाठविलें तेव्हां बापापासीं पावले. त्यांस पनाळगड देऊन, आपण सेतुयात्रेनिमित्त गुप्तमार्गे कडून येऊन, गुप्तपणें तंजाउरचा किल्ला फिरोन पाहून, एकोजीराजांस सांगोन पाठविलें जे, तुझी संपादिलें राज्य समग्र आम्ही पाहिलें, तुमचा किल्ला गरुडाद्रि आहे, थोरले किल्यास चारी बाजूनें चारी किल्ले आहेत, परंतु कठिण प्रसंग पडल्यास दक्षिणेकडील उपकिल्ला मात्र पाणियाचा आहे तेवढा राखून, वरकड पाडून सोडणें, आम्ही किल्यांत आलों तेव्हां एका दुकानांत शिक्का टाकिला तो सोधून पाठवणे. तदनंतर, एकाकित सेतुयात्रा करून तक्तास पावले. तदनंतर, शिवाजीराजे, दोघे पुत्रांस राज्य नेमून, सकळ पृथ्वीतहि प्रख्यात नांव पावून, सकळ शत्रूसहि पराभवातें पाववून निःशैल्य जाल्यावरि जन्म घेतल्याची कृतकृत्यता कांहीं जाली ह्मणून प्रपंच व राज्यपदवीचा परित्याग करून, पारमार्थिक निवृत्तिमार्गाचे ठायीं मन प्रेरून, तोच दृढाभ्यास धरून, शाश्वत अशा स्वपदास आनंदरूप होऊन पावले. शाहूराजे शके भावसंवत्सरी जन्मले.


– इतिहासाचार्य
**वि. का. राजवाडे**

# वारकरी धर्माचे संत शेख महंमद महाराज

महाराष्ट्राच्या मातीतील सांस्कृतिक वैभव असलेल्या वारकरी संत परंपरेत शेख महंमद महाराजांना आदराचे मानाचे स्थान आहे. या परंपरेने सर्वांना सामावून घेतले आहे. सनातन वैदिक ब्राह्मणी धर्माने माणसांचे माणूसपण नाकारलेल्यांना छातीशी प्रेमाचा कवटाळून घेणारा आमच्या पुर्वजांचा वारकरी धर्म जगातील द ज्ञानदेवे रचिला पाया । शेख महंमद मंदिर । तुका झालासे कळस । वंदन जोडुनी कर ।।

वारकरी धर्म वाढविण्याचे कार्य शेख महंमद महाराज यांनी केले. ते पंढरीच्या पांडुरंगाचे निस्सीम भक्त होते. संत शेख महंमद महाराजांचे मूळ गाव वाहिरा, तालुका आष्टी, जिल्हा बीड येथे आहे. वाहिरा येथून पंढरपूर, आळंदी, पैठण या ठिकाणी दरवर्षी दिंडी जाते. शेख महंमद महाराज यांचे अनेक अभंग प्रसिद्ध आहेत. त्यापैकी ऐसे केले या गोपाळे । नाही सोवळे ओवळे ।। हा अभंग इयत्ता चौथीच्या पाठ्यक्रमात आहे. तसेच एम. ए. मराठी विषयात शेख महंमद महाराज यांच्याविषयी प्रकरण आहे. कवी मोरोपंत यांनी सन्मणीमालेत व महिपती महाराजांनी भक्ती विजयात, हनुमंत स्वामींनी श्री रामदास स्वामींच्या चरित्रात, शेख महंमद महाराजांना जागा दिली आहे.

संत साहित्याचे अभ्यासक रा.चिं.ढेरे, डॉ.यू.म.पठाण, प्रा.अनिल सहस्रबुद्धे, अनिल शिंदे लिखित श्री संत शेख



महंमद स्तोत्र, किसन आटोळे लिखित चरित्र, तुकाराम दर्शन पुस्तक लेखन प्रा. सदानंद मोरे, शेख महंमद महाराज लिखित निष्कलंक प्रबोध संकलित करून प्रकाशित करणारे ह.भ.प.सिद्धीनाथ महाराज मेटे अशा अनेक साहित्यिकांनी यावर अभ्यास केला आहे. अनेकांनी यावर पीएचडी केली आहे अनेकांची सुरू आहे. संत शेख महंमद महाराज लिखित योगसंग्राम, निष्कलंक प्रबोध, पवन विजय, शेकडो अभंग आज प्रकाशित आहेत. हजारो भक्त हे वाचन करतात.

संत शेख महंमद महाराज यांचे मंदिर श्रीगोंदा व वाहिरा येथे आहे. याठिकाणी दरवर्षी भंडारा भरतो. लाखो भाविक भक्त दर्शनासाठी येतात. जगाच्या कल्याणा संतांची विभूती । देह कष्टविती परोपकारे ।। याप्रमाणे संत शेख महंमद महाराजांचे कार्य उत्तुंग आहे. संत हे जातीधर्माच्या पलीकडचे असतात. त्यांचे साहित्य वाचल्यानंतर माणसाला प्रेरणा ऊर्जा मिळते. श्रीगोंदा येथील ऐतिहासिक चकनामा प्रसिद्ध आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे आजोबा मालोजीराजे भोसले यांनी शेख महंमद महाराजांना गुरु मानले व इनामी जमीन दिली. तोच हा चकनामा. वाहीरा व रुई नालकोल या ठिकाणी औरंगजेब बादशहा याने ४०० एकर जमीन इनामी दिली. यावरून संत शेख महंमद महाराज यांचा अधिकार समजून येतो. संत शेख महंमद महाराज यांचे गुरू चांद बोधले महाराज उर्फ चंद्रभट्ट बोधले या नावानेही ते ओळखले जातात. त्यांनी शेख महंमद महाराज यांना अध्यात्माचे ज्ञान दिले. शेख महंमद महाराज थोर संत आहेत. त्यांचे साहित्य वाचन करावे. वेगळीच अनुभूती येते. हे साहित्य प्रकाशित करण्याचे कार्य संत शेख महंमद महाराज प्रतिष्ठान, वाहिरा हे करत आहेत. शेख महंमद महाराज यांच्या कार्याचा प्रचार प्रसार व्हावा म्हणून वाहिरा ते पंढरपूर आषाढी वारी मोठ्या थाटात सुरू आहे. वारकरी संप्रदायाचा भगवा ध्वज व संत शेख महंमद महाराजांचा शांतीचा श्वेता ध्वज डौलाने फडकत आहे. ही विचारांची वारी समाजाला विचार देत देत दरवर्षी पंढरीला जाते.

**– ह.भ.प.किसन आटोळे**
शेख महंमद महाराज चरित्रकार
८२७५३२७०३०

# शिवरायांचे पर्यावरण आज्ञापत्र

६ जून रोजी सर्वत्र शिवराजाभिषेक दिन साजरा करण्यात येतो आणि ५ जून रोजी जागतिक पर्यावरण दिन साजरा झाला. ३५१ वर्षांपूर्वी राज्याभिषेक झालेले चक्रवर्ती सम्राट छत्रपती शिवरायांनी त्याकाळातले पर्यावरण संदर्भातले आज्ञापत्र आजच्या घडीला देखिल तितकेच महत्वपूर्ण आहे. समरभुमी उंभरखिंड येथील विजयस्तंभावर छत्रपती शिवाजी महाराजांचे पर्यावरण संदर्भातले कोरलेले आज्ञापत्र समजून घेऊया...

दूरदृष्टीचा जाणता राजा

“**शिवरायांचे आज्ञापत्र**” “आरमारास तख्ते सोट, डोलाच्या काठ्या आदिकरून थोर लाकूड असावे लागते, ते आपल्या राज्यात अरण्यामध्ये सागवनादि वृक्ष आहेत त्यांचे जे अनुकूल पडेल ते हुजूर लेहुन हुजुराचे परवानगीने तोडून न्यावे. याविरहीत जे लागेल ते परमुलखीहून खरेदी करून आणवित जावे. स्वराज्यातील आंबे, फणस हेही करून लाकडे आरमाराच्या प्रयोजनाची परंतु त्यास हात लावू न द्यावा. काय म्हणोन की ही झाडे वर्षा दोन वर्षातून होतात ऐसें नाही. रयतेने ही झाडे लावून बहुतकाळ जतन करून वाढविली. ती झाडे तोडल्यावर त्यांचे दुःखास पारावार काय? येकास दुःख देऊन जे कार्य करीन म्हणेल ते कार्य करणारासहीत स्वल्पकाळेच बुडोन नाहीसेच होते. किंबहुना धन्याचेच पदरी प्रजापीडणाचा दोष पडतो. या वृक्षीच्या अभावें हानिही होते.याकरिता हे गोष्ट सर्वथा होऊ न द्यावी, कदाचित एखादे झाड जे बहुत जीर्ण होऊन कामातून गेले असेल तरी त्याचे धन्यास राजी करून द्रव्य देऊन त्याच्या संतोषे न्यावे, बलात्कार सर्वथा न करावा”

